# <u>बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे ऑगस्ट – २०१८</u>

## बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र. ११२/२०११ कलम ३०२,३९७,३४ भादविसं. सह ३७(१) मपोका |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २६/०२/२०११ रोजी २२.१५ वा.चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | वरळी सी लिंक रोड, नॉर्थ लेन, बांद्रा पश्चिम, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | फिर्यादी कु. स्वाती सुभाष शिर्के वय १९ वर्षे |
| ५ | **मयत** | वृषभ भालचंद्र यादव वय १९ वर्षे |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | १) लेडीज पर्स त्यामध्ये रोख रू.१००/–,<br>२) एसर कंपनीचा मोबाईल अं.कि.रू.५०००/–<br>अशी एकुण रू.५१००/–ची मालमत्ता |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | १) लेडीज पर्स त्यामध्ये रोख रू.१००/–,<br>२) एसर कंपनीचा मोबाईल अं.कि.रू.५०००/–<br>अशी एकुण रू.५१००/–ची मालमत्ता |
| ८ | **हस्तगत हत्यार** | गुन्हयात वापरलेला धरदार चॉपर |
| ९ | **आरोपी अटक** | १) शाजहान मिया मुर्तुझा वय २६ वर्षे व<br>२) खबीरुल रेझीब शेख वय १९ वर्षे<br>**अटक दिनांक २१/०९/२०१५ रोजी १४.३० वा.** |

बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र. ११२/२०११ कलम ३०२,३९७,३४ भादविसं. सह ३७(१) मपोका या गुन्हयात दिनांक २६/०२/२०११ रोजी २२.१५ वा.चे सुमारास वरळी सी लिंक रोड, नॉर्थ लेन, बांद्रा पश्चिम, मुंबई याठिकाणी यातील फिर्यादी कु. स्वाती सुभाष शिर्के, वय १९ वर्षे व मयत इसम नामे वृषभ भालचंद्र यादव, वय १९ वर्षे हे बोलत उभे असताना यातील अनोळखी आरोपीत इसमाने जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने यातील मयत इसम नामे वृषभ भालचंद्र यादव, वय १९ वर्षे याचेवर प्राणघातक शस्त्राने वार करून जबर जखमी केले. तसेच फिर्यादी यांचेवर प्राण घातक शस्त्र चॉपरने वार करून त्यांचे ताब्यातील रोख रक्कम असलेली पर्स व बळीत मयत इसमाचे पैशांचे पाकीट जबरीने चोरी केली व वृषभ भालचंद्र यादव, वय १९ वर्षे याचा खुन केला म्हणून फिर्यादी यानी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २६/०२/२०११ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई च्या पथकाने तात्काळ घटनास्थळास भेट देवून प्राथमिक तपास करून घटनास्थळाचा मोबाईल टॉवर डमडेटा काढून नमुद गुन्हयातील संशयीत आरोपीताचे मोबाईल नंबर मिळवून नमुद गुन्हयातील आरोपी क्र. १) समीर अमीर उद्दीन शेख वय १९ वर्षे, २) शफीक रफीक शेख वय ३० वर्षे यांना दिनांक ११/०४/२०११ रोजी कौशल्याने अटक केले. अटक आरोपीताकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास केला असता, त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचा आणखी एक सहकारी नामे मन्सुर मलिक अबू नासीर मलिक उर्फ सलीक अबू नासीर (**पाहिजे आरोपी**) याचेसह केल्याची कबुली दिली. सदर पथकाने अटक आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दि.२८/११/२०११ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, ९ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई येथे कोर्ट केस क्र.१८३६/पीडब्ल्यू/२०११ अन्वये दोषारोप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दि.१२/०३/२०१३ रोजी सेशन केस क्र.२६४/२०१३ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

सदर पथकाने मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच नमुद गुन्हयात फिर्यादी हया एकमेव साक्षीदार असल्याने त्यांचे साक्षीवर संपुर्ण केस अवलंबून होती. फिर्यादी या १९ वर्षीय कॉलेज विदयार्थिनी असून त्यांचेवर नमुद गुन्हयात प्राणघातक हल्ला झाल्याने त्या प्रचंड दडपणीत होत्या. तसेच सदरची घटना ही निर्जनस्थळी रात्री २१.३० वा.चे सुमारास झालेली असल्याने अंधारात फिर्यादींनी आरोपीताला व्यवस्थित पाहिलेले नव्हते. त्यामुळे फिर्यादींना

आरोपीचा फोटो वारंवार दाखवून त्यांना सर्वोतोपरी धीर देवून व निर्भिडपणे साक्ष देण्यास प्रोत्साहित करण्यात आले. तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल तसेच मोबाईल सीडीआर चा तांत्रीक विश्लेषण पुरावा सुनावणी दरम्यान सादर करण्यात आल्याने मा. सत्र न्यायालयाने आरोपी क्र. १) समीर अमीर उद्दीन शेख वय १९ वर्षे यास नमुद गुन्हयात दोषी ठरविले. तसेच यातील आ.क्र. २) शफीक रफीक शेख वय ३० वर्षे यास सबळ पुराव्या अभावी नमुद गुन्हयातुन दोषमुक्त केले. तसेच सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे मन्सुर मलिक अबू नासीर मलिक उर्फ सलीक अबू नासीर यास मा. न्यायालयाने फरारी घोषीत करून त्यास नमुद गुन्हयात अटक केलेवर नव्याने दोषारोप पत्र सादर करण्याबाबत निर्णयात आदेशित केले आहे.

मा. सत्र न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ३१/०८/२०१८ रोजी आरोपी नामे समीर अमीर उद्दीन शेख वय १९ वर्षे यास दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—

**अ)** भादवि. कलम ३०२ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद,

**ब)** भादवि. कलम ३९७ प्रमाणे **०७ वर्षे सश्रम कारावास**

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीने एकत्र भोगायच्या आहेत.

बांद्रा पोलीस ठाणे च्या पथकाने मानवी कौशल्य व तांत्रिक तपासाचा वापर करून प्राणघातक शस्त्राने फिर्यादी यांचेवर वार करून त्यांचे ताब्यातील रोख रक्कम असलेली पर्स व बळीत मयत इसमाचे पैशांचे पाकीट जबरीने चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करून त्यांचेविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे ऑगस्ट — २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :—**

| **अक्र.** | **अधिकारी व अंमलदाराचे नाव** |
|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय शंकर पाटील |
| २ | पोलीस निरीक्षक कुंडलीक जगन्नाथ गाढवे |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र दादासाहेब दोरकर |
| ४ | पो.ह.क्र.१७८७/संतोष सिताराम घाडीगावकर |

——— ००० ———